क्र. सिडको/कार्मिक/आस्था/२०२०/ई-२१२८.                                    दिनांक :- १२.०३.२०२०

# कार्यलयीन परिपत्रक

**विषय :- सुधारित रजा प्रवास सहाय्य योजना.**

१. महामंडळाच्या संचालक मंडळाचा ठराव क्र.१२३०१ दि. ०७.०२.२०२० अन्वये रजा प्रवास सहाय्य योजनेचे सुधारित दर गटवर्ष २०२०-२०२१ पासून खालील प्रमाणे लागू करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मूळ पगाराची मर्यादा | सुधारित रजा प्रवास सहाय्य |
|---|---|---|
| ०१ | ज्या कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन रु. १८०००/- पर्यंत आहे. (सातव्या वेतन आयोगा प्रमाणे) | रु. २०८००/- |
| ०२ | ज्या कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन १८००१/- च्या पुढे आहे. (सातव्या वेतन आयोगा प्रमाणे) | रु. ३२०००/- |

२. मागील गटवर्षातील म्हणजेच गट वर्ष २०१८-२०१९ मध्ये न उपभोगलेली रजा प्रवास सवलत पुढील गटवर्षामध्ये उपभोगता येईल. परंतु रजा प्रवास सहाय्य योजनेचे सलग दोन लाभ संयुक्तपणे घेता येणार नाहीत. सलग दोन प्रवास लाभामध्ये कमीत कमी १८० दिवसांचे अंतर असणे आवश्यक राहील.

३. सदर रजा प्रवास सहाय्य योजने अंतर्गत सुधारीत रकमेचा लाभ दि. ०७.०२.२०२० पासून लागू करण्यात येत आहे. गट वर्ष २०२०-२०२१ मध्ये ज्या कर्मचाऱ्यांनी दि. ०७.०२.२०२० पूर्वी लाभ घेतला आहे त्यां कर्मचाऱ्यांना सदर सुधारित रकमेचा लाभ / फरक अनुज्ञेय असणार नाही.

४. सिडको कर्मचारी प्रवास सहाय्य नियम, १९८० व त्याअनुषंगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या इतर अटी व शर्ती कायम राहतील.

५. रजा प्रवास सहाय्य योजनेचा लाभ घेण्यापूर्वी सर्व कर्मचाऱ्यांनी विभाग प्रमुखांची SAP प्रणाली मार्फत पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

६. सर्व विभाग प्रमुखांना सदर परिपत्रक सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावे ही विनंती. सदर परिपत्रक हे cidcoindia.com/intranet या संकेत स्थळावर Circulars / Orders अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

प्रशांतभांगरे

(प्रशांत भ. भांगरे)
व्यवस्थापक (कार्मिक)

**प्रति:-**

१. सर्व विभाग प्रमुख / खाते प्रमुख, सिडको.
२. प्रशासक (औरंगाबाद/नाशिक/नांदेड/नागपूर) सिडको.

**प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव:-**

१. मुख्य लेखाधिकारी , सिडको.
२. व्यवस्थापक (प्रणाली) , सिडको.

CS Scanned with CamScanner